सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १७८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २० ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# धनुष्यबाण चिन्ह गोठवणार?

## दोन्ही सेनेच्या भांडणाचा फायद भाजपला

### प्रकाश आंबेडकरांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अकोला –**

शिवसेना नाव आणि चिन्हाबाबत सुप्रीम कोर्टात अंतिम सुनावणी सुरू आहे. गेल्या ७ दिवसांपासून या सुनावणीत उद्धव ठाकरेंकडून कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी युक्तिवाद मांडला. या युक्तिवादावरून वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मोठा दावा केला आहे. दोन्ही शिवसेनेतील या भांडणाचा फायदा भाजपाला होताना दिसत आहे असं सांगत त्यांनी कदाचित चिन्ह गोठवले जाऊ शकते असा दावा केला आहे. अकोला येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

प्रकाश आंबेडकरांनी या सुनावणीवर म्हटलं की, सुप्रीम कोर्टात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या सेनेत भांडण सुरू आहे. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावरून या खटल्याचा निकाल दिसतो. अगोदर दक्षता न घेतल्याने निवडणूक आयोगाने शिंदेंना दिलेले चिन्ह आणि त्यावर सुप्रीम कोर्टाने शिक्कामोर्तब केले होते. परंतु आताची परिस्थिती पाहिली याचा फायदा कोणाला तर तो भाजपाला होताना दिसत आहे. शिवसेनेचे चिन्ह गोठवले जाईल



असं दिसते. चिन्ह गोठवल्यास दोन्ही सेनेला एकमेकांविरोधात लढावे लागण्याची परिस्थिती आहे. चिन्ह नसल्याने या दोघांकडे असणारे आमदार, खासदार टिकतील का सगळ्यात मोठा प्रश्न आहे असं त्यांनी सांगितले.तसेच या भांडणाचा फायदा भाजपाला आहे. जर कोर्टाने चिन्ह गोठवले तर या दोन्ही पक्षातील आमदार, खासदार भाजपाकडे पळाल्याशिवाय राहणार नाहीत अशी परिस्थिती आहे. निर्णय कुणाच्याही बाजूने लागो पण फायदा भाजपाचा आहे. मध्यंतरी फोडाफोडीचे जे सत्र त्यांनी सुरू केले होते, पण जंतर मंतरवरील आंदोलनानंतर या प्रकाराला आळा बसला होता. आता पुन्हा चिन्ह गोठवल्याचा निर्णय झाल्यानंतर आमदार, खासदारांची पळापळ होण्याची दाट शक्यता दिसते. त्यामुळे सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचा फायदा भारतीय जनता पक्षाला मिळण्याची स्थिती दिसून येते असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं.

# दु:खाच्या सावलीतून नव्या आयुष्याकडे..

## कोरोनाकाळात पती गमावलेल्या एकल मातेचे CM फडणवीसांनी केले कन्यादान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० नागपूर**

कोरोनाकाळात पती गमावल्यानंतर दोन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी एकटीने पेलणाऱ्या महिलेच्या आयुष्यात आज पुन्हा एकदा आनंदाचे क्षण आले. नागपूरच्या लक्ष्मीनगर परिसरातील राणी लक्ष्मी सभागृहात अभिजित मुहूर्तावर या महिलेचा पुनर्विवाह पार पडला. विशेष म्हणजे, या विवाहसोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.




माजी आमदार संदीप जोशी यांच्या 'सोबत' पालकत्व प्रकल्पाअंतर्गत झालेला हा पहिला विवाह ठरला. संदीप जोशी आणि त्यांच्या पत्नी देवयानी जोशी यांनी या महिलेचे कन्यादान केले. या विवाहसोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही उपस्थित राहून नवदाम्पत्याला आशीर्वाद दिले. कोरोनाच्या काळात अनेक कुटुंबांनी आपल्या कुटुंबातील कर्त्या व्यक्तीला गमावले. त्यामुळे अनेक महिला आणि मुलांसमोर आर्थिक तसेच सामाजिक अडचणी उभ्या राहिल्या. अशा कुटुंबांना आधार देण्यासाठी संदीप जोशी यांच्या पुढाकारातून 'सोबत' पालकत्व प्रकल्प सुरू करण्यात आला. या उपक्रमातून कोरोनाकाळात २९३ कुटुंबांचे पालकत्व स्वीकारण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. कोरोनाकाळात अनेक कुटुंबांतील कर्ते पुरुष गेल्याने त्यांच्या कुटुंबांचे भविष्य अंधारात आले होते. त्यावेळी संदीप जोशी पुढे आले आणि २९३ कुटुंबांची नोंदणी झाली. आपणही त्यावेळी या कुटुंबांपैकी १०० कुटुंबांचे पालकत्व स्वीकारले होते, असे फडणवीस यांनी सांगितले. या कुटुंबांच्या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्यात आले. त्यापैकी एका एकल मातेचा आज विवाह झाला आहे. पुढील काळात जवळपास ३०० मुलींचे विवाह होईपर्यंत आम्ही त्यांची जबाबदारी स्वीकारली आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. अल्पवयातच मोठ्या संकटांना सामोरे जावे लागलेल्या या कुटुंबांच्या आयुष्यात आता स्थैर्य येत असल्याचे पाहून समाधान वाटत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# अदानी गॅसच्या कामाला शासनाची 'स्पीड'

## अमरावतीत नागरिकांच्या विरोधामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

### सीजीडी कंपन्यांना २४ तासांत परवानगी; 'डीम्ड अप्रूव्हल'ची तरतूद, अग्निशमन व वाहतूक पोलिसांच्या एनओसीचीही गरज नसल्याचे शासन पत्रात स्पष्ट

**विदर्भाप्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

अमरावती : शहरात पाईप्ड नॅचरल गॅस (झछत्रः) पाईपलाईन टाकण्याच्या कामाला काही नागरिकांकडून विरोध होत असतानाच महाराष्ट्र शासनाच्या एका पत्रामुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. राज्यातील नेटवर्कचा वेगाने विस्तार करण्यासाठी शासनाने उत्रऋ कंपन्यांना विविध सवलती दिल्या आहेत. अमरावतीत अदानी गॅसकडून सुरू असलेल्या पाईपलाईनच्या कामाच्या पार्श्वभूमीवर शासनाचे हे निर्देश चर्चेचा विषय ठरले आहेत.शासनाच्या पत्रानुसार, उत्रऋ पाईपलाईनसाठी विविध विभागांकडे प्रलंबित असलेल्या परवानग्या मंजूर झालेल्या समजण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी उत्रऋ कंपन्यांना नवीन परवानगी २४ तासांच्या आत द्यावी, असे निर्देश आहेत.विशेष म्हणजे पाईपलाईन टाकणे, खोदकाम आणि रस्ता पूर्ववत करण्यासाठी मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांची किंवा वाहतूक पोलिसांची स्वतंत्र परवानगी अथवा छजउ आवश्यक नसल्याचेही शासन पत्रात नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्यास संबंधित कंपनीने स्वतःच्या खर्चाने ती पूर्ववत करावी, अशी तरतूदही करण्यात आली आहे. गरजेनुसार उत्रऋ कंपन्यांना २४ तास काम करण्याची मुभा देण्यात आली आहे.

राज्यात PNG नेटवर्कचा जलद विस्तार करण्यासाठी देण्यात आलेल्या या सवलतींना नगर विकास विभागाने ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिल्याचे पत्रातून स्पष्ट होते. शासनाने मंजूर केलेल्या सवलती क्षेत्रीय पातळीवर कंपन्यांना प्रत्यक्ष मिळत नसल्याची बाब आढावा बैठकीत निदर्शनास आल्याचेही पत्रात नमूद आहे.दरम्यान, अमरावती शहरात अदानी गॅसकडून झछत्रः पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी रस्त्यांचे खोदकाम, कामाची पद्धत आणि सार्वजनिक मालमत्तेच्या वापराबाबत काही नागरिकांनी आक्षेप घेतले आहेत. स्थानिक पातळीवरील परवानग्या आणि महापालिकेच्या अधिकारांबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.त्यामुळे शासनाच्या' आणि २४ तासांत परवानगीच्या निर्देशांमुळे महापालिकेचे अधिकार नेमके किती मर्यादित होतात? तसेच



अमरावतीत अदानी गॅसला कोणत्या परवानग्यांच्या आधारे काम करण्याची मुभा देण्यात आली आहे, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे ठरले आहे.नागरिकांच्या आक्षेपांवर तोडगा काढत झछत्रः प्रकल्पाचा विस्तार करणे आणि त्याचवेळी रस्ते, वाहतूक व सार्वजनिक मालमत्तेची सुरक्षितता सुनिश्चित करणे, हे प्रशासनासमोरचे महत्त्वाचे आव्हान आहे.–

# रु१५०० कोणाला मिळणार अन् कोणावर होणार कारवाई?




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई –** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'तील अपात्र लाभार्थ्यांबाबत सुरू असलेल्या चर्चांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिले आहे. नियमाबाहेर कोणालाही एकही रुपया दिला जाणार नाही आणि पात्र असलेल्या सर्व महिलांना नियमितपणे पैसे मिळत राहतील, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यात एक कोटी ६५ लाख महिला या योजनेसाठी पात्र ठरल्याची माहितीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

योजनेतून नाव वगळण्यात आल्याच्या मुद्द्यावर बोलताना फडणवीस म्हणाले, या संदर्भात याआधीही स्पष्टीकरण देण्यात आले आहे, मात्र रोज त्याच चर्चा घडवून आणल्या जात आहेत. योजनेचे निश्चित नियम आणि निकष आहेत. योजना सुरु करताना महिलांना त्रास होऊ नये म्हणून तातडीने कठोर तपासणी करणे शक्य नव्हते. त्यामुळे नंतर पुनरतपासणी करण्यात आली आणि ई-केवायसी (श-घधउ) प्रक्रिया राबवण्यात आली.

काही सरकारी कर्मचाऱ्यांनीही या योजनेसाठी अर्ज भरले होते. मात्र, नियमांचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असा इशारा यावेळी त्यांनी दिला.

# आश्रमशाळा-दिव्यांगांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास मंत्री सावेंवर हक्कभंग आणावा लागेल- बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती –**

आश्रम शाळेंच्या परिस्थितीबद्दल मी स्वत विधींमंडळात चर्चा केली असून मंत्री अतूल सावे यांनी मला शब्द दिला आहे की मुख्यमंत्र्यांशी चर्चा करतो. पण त्या गोष्टीला एक महिना झाला असून आता अतूल सावे यांच्यावरच हक्कभंग सादर करावा लागेल अशी परिस्थिती आमच्यावर आली आहे. आम्हाला दिलेल्या आश्वासनांची पुर्तता होत नाही, सत्तेत राहुन आमच्यावर आंदोलन करण्याची वेळ येऊ नये असे शिवसेना नेते बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

बच्चू कडू म्हणाले की, जाती पातीच्या राजकारणात अशा प्रमुख प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये. मी पुन्हा एकदा माध्यमांच्या माध्यमातून अतूल सावेंना विनंती करतो की दिव्यागांचे मानधन, वस्तीगृह, शाळा हे सर्व प्रश्न तुम्ही सोडवा. अजित पवार असताना ते सांगत होते की ५ तारखेच्या आत जर मानधन झाले नाही तर मी वित्त सचिवाचे मानधन करणार नाही. अजित पवार गेले आणि शब्दही गेला. आता कोणी शब्द देणारा मंत्री भेटतो का हे आम्ही शोधतो आहोत.बच्चू कडू म्हणाले की,कोणतीही संघटना एका माणसाच्या कुटुंबापुरती मर्यादित नसते. अनेक लोकांनी त्यासाठी त्याग केलेला असतो



हे उद्धव ठाकरे यांना समजत असेल. शिवसेना प्रहारमध्ये विलीन करण्याची वेळच येणार नाही. शिवसेना, शिवसेनेतले वाघही कायम राहतील.

### निकाल आमच्याच बाजूने लागेल

बच्चू कडू म्हणाले की, शिवसेना पक्ष आणि चिन्हांचा निकाल एकनाथ शिंदेंच्या बाजूनेच लागेल आणि नाही लागला तरी एकनाथ शिंदे सक्षम आहेत. केवळ नाव आणि चिन्हावर सर्व काही होत नसते त्यामुळे चिंता करण्याची काही गरज नाही. बच्चू कडू म्हणाले की, राज्यात काही गोष्टीबद्दल चिंतन करण्याची गरज आहे. जर अत्याचारासारख्या घटना वारंवार घडत असतील तर छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श घेतला पाहिजे. या घटना कशा रोखता येतील यासाठी प्लॅन तयार करणे गरजेचे आहे. तर झालेल्या घटनेप्रकरणी तातडीने शिक्षा देण्यासाठी तातडीने कारवाई करण्यासाठी नवीन कायदे आणले गेले पाहिजे.

# इयत्ता १ली ते ८वीच्या विद्यार्थ्यांना मिळणार मोफत दप्तर: राज्य सरकारचा मोठा निर्णय

## १७४ कोटींच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता

### पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० मुंबई** –राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने मोठी घोषणा केली आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमांतर्गत आता मोफत शालेय दप्तर देण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला असून, दप्तर खरेदीसाठी १७४ कोटी १९ लाख ३५ हजार ४२४ रुपयांच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. दप्तर खरेदीची प्रक्रिया ई-निविदेद्वारे करण्यात येणार असून, शासनाने त्यासाठी आवश्यक अटी आणि नियम निश्चित केले आहेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या



योजनेचा विस्तार करण्यात आला आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इयत्ता पहिली ते पाचवी आणि इयत्ता सहावी ते आठवी अशा दोन गटांतील विद्यार्थ्यां ची संख्या विचारात घेऊन दप्तरांची आवश्यकता निश्चित केली जाणार आहे. त्यानुसार खरेदी प्रक्रिया राबवली जाईल. दप्तर पुरवण्या साठी शासनाकडे १७४ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाला अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अंतिम खरेदी खर्च निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्पष्ट होणार आहे. विद्यार्थ्यांसाठी दप्तरांची खरेदी थेट पद्धतीने न करता ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येणार आहे. यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनाल याकडून निविदेचे प्रारूप तयार केले जाणार असून, त्याला शासनस्तरावर आवश्यक मान्यता घेतल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू होईल.

## संपादकीय ......

# आश्रमशाळांचा विलाप

राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील दुरवस्था ही पाचवीला पूजलेली समस्या बनली आहे. दुर्गम, डोंगराळ, आदिवासीबहुल भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी या आश्रमशाळांची स्थापना करण्यात आली. जुन्या मुंबई राज्यात १९५३-५४ च्या सुमारास सर्वप्रथम आदिवासी आणि विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या मुलांसाठी आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. शासनाने १९७२-७३ पासून राज्यभरात मोठ्या प्रमाणावर आश्रमशाळा सुरू करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी केली. दुर्गम भागातील अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी घरापासून दूर जावे लागू नये आणि त्यांना राहण्या-खाण्याची मोफत सोय एकाच ठिकाणी मिळावी, या हेतूने शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांचे जाळे विणण्यात आले. सुरुवातीला या शाळा प्राथमिक स्तरावर होत्या. काळानुरूप त्यांचा विस्तार माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत केला गेला.

सध्या या योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानित स्वरूपात ५५६ आश्रमशाळा चालविल्या जातात. पैकी ३७ प्राथमिक म्हणजे इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंत, तर ३१९ माध्यमिक म्हणजे १ ली ते १० वीपर्यंत आहेत. माध्यमिक आश्रमशाळांशी संलग्न २०० कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. यात सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ विद्यार्थी शिकताहेत. त्यातील १ लाख ४० हजार २५४ मुले आणि १ लाख २१ हजार ५८२ मुली आहेत. या शाळांच्या व्यवस्थापनात आणि पायाभूत सुविधांतील त्रुटी, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि आरोग्याचे प्रश्न यामुळे येथील मुला-मुलींच्या सुरक्षिततेचा मुद्दा वेळोवेळी ऐरणीवर आला आहे. गडचिरोली जिल्ह्यात जपतलाई येथील आश्रमशाळेत तीन चिमुकल्या मुलींचा सर्पदंशाने मृत्यू झाला. सरकारी यंत्रणेच्या अक्षम्य दुर्लक्षाचा आणि संवेदनहीनतेचा बळी म्हणून या चिमुकल्यांच्या मृत्यूकडे पाहिले पाहिजे. ज्या ठिकाणी समाजातील वंचित घटकातील मुले शिक्षणाची स्वप्ने पाहत सुरक्षित निवाऱ्याच्या आशेने येतात, त्याच ठिकाणी त्यांचा असा करुण अंत व्हावा, हे अत्यंत वेदनादायी आहे.व्यवस्था किती पोकळ आहे, हे सांगण्यासाठी मृत मुलींच्या पालकांच्या डोळ्यांतील अश्रू पुरेसे आहेत. या आश्रमशाळांच्या परिसरात सापांची बिळे, विटांचे ढिगारे आणि सर्वत्र साचलेले सरपण असे चित्र दिसते. स्वच्छतेचा अभाव आणि परिसराची दुरवस्था यामुळे सापांना तिथे आश्रय मिळणे स्वाभाविक आहे. आश्रमशाळेत नियमांचे उल्लंघन करून प्रवेश दिले जात असल्याचे समोर आले आहे. कागदावर विद्यार्थी संख्या वाढवून सरकारी अनुदान लाटण्याचे प्रकारही घडले आहेत. मुख्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत ही आश्रमशाळा सरकारी अनुदान घेत असूनही शिक्षक, वॉर्डन तसेच इतर आवश्यक सुविधा पुरवत नसल्याचे नमूद केले होते. एका पाहणीनुसार, गेल्या दोन वर्षांत २२ प्रकल्पांमध्ये ४०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारच्या २००२ ते २०१२ या दहा वर्षांत ७९३ आदिवासी विद्यार्थ्यांचा आश्रमशाळांमध्ये मृत्यू झाला होता. हे मृत्यू गंभीर आजार, अपघात, गळफास किंवा सर्पदंशामुळे होत आहेत.

निवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी बेडची शिफारस केलेली आहे; पण जवळपास ५० टक्के आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना जमिनीवरच झोपावे लागते. राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी वयाची अट निश्चित केली आहे. याचा फटका दुर्गम भागातून येणाऱ्या व शिक्षणात उशीर झालेल्या विद्यार्थ्यांना बसत आहे. तीव्र विरोधानंतर वयोमर्यादेत काही बदल केले, तरी या अटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण आहे. आर्थिक, कौटुंबिक किंवा आरोग्यविषयक कारणांमुळे ज्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काही काळ खंड पडला, अशांना प्रवेश मिळण्यात अडचणी निर्माण करणाऱ्या कडक तरतुदी या निर्णयामध्ये आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही आंदोलन, सामाजिक-विद्यार्थी संघटनांच्या कार्यात सहभाग घेऊ नये, अशा अटी लादल्याचा आरोप विद्यार्थी संघटनांनी केला आहे. सलग तीन महिने ७० टक्क्यांपेक्षा कमी उपस्थिती असल्यास प्रवेश रद्द करण्याची तरतूद यात आहे. या पार्श्वभूमीवर केवळ मृत मुलींच्या पालकांना मदत देऊन किंवा आश्वासने देऊन किंवा एखादी आश्रमशाळा बंद करून हे प्रश्न सुटणार नाहीत.

# अखेर १०२ रुग्णवाहिका चालकांचे आंदोलन मागे




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अचलपूर**
वेतन वेळेवर मिळत नसल्यासह ईपीएफची रक्कम जमा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या कंत्राटदारांच्या विरोधात १०२ रुग्णवाहिका चालकांनी पुकारलेले आंदोलन अखेर मागे घेण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी चालकांच्या विविध मागण्या मान्य करीत कंत्राटदारांकडून ईपीएफ व वेतनाची वेळेत पूर्तता न झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्याची हमी दिली. त्यामुळे आंदोलनकर्त्या चालकांना दिलासा मिळाला. जिल्ह्यातील १०२ रुग्णवाहिका सेवा सुरळीत ठेवण्यात चालकांची महत्त्वाची भूमिका आहे. मात्र मागील काही काळापासून वेतन वेळेवर न मिळणे, ईपीएफची रक्कम नियमितपणे जमा न होणे यांसह विविध समस्यांना चालकांना सामोरे जावे लागत होते. वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी न लागल्याने चालकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.

दरम्यान, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी रुग्णवाहिका चालकांच्या आंदोलनाला भेट देत प्रतिनिधींसोबत चर्चा केली. यावेळी चालकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला. कंत्राटदारांनी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर अदा करणे तसेच ईपीएफची रक्कम नियमानुसार जमा करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. वेतन अथवा ईपीएफबाबत पुन्हा टाळाटाळ झाल्यास संबंधित कंत्राटदारांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट हमी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. प्रशासनाच्या या आश्वासनानंतर चालकांनी आंदोलन मागे घेतले. आता दिलेल्या आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी होते का, याकडे चालकांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मोबाईल, लॅपटॉप चोरी प्रकरणी दोन चोरटे अटक



**विदर्भा प्रजासत्ताक दि.२० अमरावती :** स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थिनीच्या भाड्याच्या खोलीतून लॅपटॉप आणि तीन महागडे मोबाइल चोरणाऱ्या दोन चोरट्यांना शहर गुन्हे शाखेने अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून तब्बल १ लाख ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. निखिल विलास ताठे (२१, रा. महेंद्र कॉलनी) आणि शेख नजीर शेख कदीर (२९, रा. जमीला नगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.गाडगेनगर परिसरात भाड्याने राहणाऱ्या प्रतीक्षा (२५) यांच्या खोलीतून १९ मे रोजी अज्ञात चोरट्यांनी लॅपटॉप आणि तीन महागडे मोबाइल लंपास केले होते. याप्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शहर गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला.तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढला. दरम्यान, एक तरुण चोरीचा लॅपटॉप विक्रीसाठी इतवारा बाजार परिसरात येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून निखिल ताठे याला ताब्यात घेतले.चौकशीत त्याने चोरीची कबुली दिल्यानंतर त्याच्या साथीदाराची माहिती मिळाली. त्यानंतर शेख नजीर शेख कदीर यालाही अटक करण्यात आली. दोन्ही आरोपींकडून १ लाख ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गाडगेनगर पोलिस करीत आहेत.

# वन्यप्राण्यांचा हैदोस ! कायमस्वरूपी बंदोबस्ताची मागणी

## युवा स्वाभिमान पक्षाचे विभागीय आयुक्तांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२० अमरावती**
रोही, नीलगाय, रानडुकरे तसेच अन्य वन्यप्राण्यांमुळे अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्याचबरोबर वन्यप्राण्यांमुळे रस्ते अपघातांचे प्रमाणही वाढत असल्याने या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी युवा स्वाभिमान पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात विभागीय आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनानुसार, जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी १२ तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अमरावती चांदूरबाजार, अमरावती-दर्यापूर, अमरावती-परतवाडा, अमरावती भातकुली-दर्यापूर, अमरावती-कुऱ्हा आणि अमरावती-मोर्शी या प्रमुख मार्गावर रोही व अन्य वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांनी यापूर्वी प्रशासन व वन विभागाकडे वारंवार निवेदने देऊनही अपेक्षित कारवाई होत नसल्यानेप्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी युवा स्वाभिमान पार्टीने केली आहे. वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करताना शेतकऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होत आहे.

रोहींच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेशीर व वैज्ञानिक पद्धतींचा अभ्यास करून उपाययोजना वन्यप्राण्यांना सुरक्षित उपाय योजना कराव्यात वन्यप्राण्यांना सुरक्षित अधिवासातस्थलांतरित करावे, पिकांच्या नुकसानीसाठी १०० टक्के नुकसानभरपाई द्यावी आणि सामूहिक कुंपणासाठी १०० टक्के शासकीय अनुदान द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनावर सुनील राणा, प्रकाश साबळे, उमेश ढोणे, आशिष कावरे, देवानंद राठोड, गंगाधर श्रीखंडे, शेखर अवघड, अनेक शेतकरी व पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत

# आरोग्यमंत्र्यांचा पथ्रोट आरोग्यकेंद्राशी संवाद

## अमरावती जिल्ह्यात एकमेव निवड



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० पथ्रोट-** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडून आयोजित केलेल्या कार्यक्रमात अमरावती जिल्ह्यातून एकमेव निवड झालेल्या पथ्रोट आयुष्यमान आरोग्यमंदिराशी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दुहेरी संवाद साधला. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील आरोग्य संस्थेसोबत थेट जनसंवाद करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडून नियोजन करण्यात आले होते.

ज्यामध्ये पथ्रोट येथील आयुष्यमान आरोग्यमंदिराची अमरावती जिल्ह्यातून एकमेव निवड करण्यात आली होती, हे विशेष. यावेळी ऑनलाइन पद्धतीने झालेल्या या दुहेरी संवाद कार्यक्रमात आरोग्य समिती, आहार समिती, संस्थेत मिळणाऱ्या आरोग्यसेवा आणि सुविधा तसेच आरोग्यकेंद्रात राबवित असणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांबाबत तसेच आरोग्यकेंद्रात असलेल्या आवश्यक समस्यांच्या बाबतीत सुद्धा वासंतीताई मंगरोळे, अतुल वाठ, नारायण इंगळे या समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून आरोग्यमंत्र्यांना माहिती देण्यात आली.

पदाधिकाऱ्यांनी मांडलेल्या समस्या मंत्री महोदयांनी ऐकून घेऊन त्याबाबत आरोग्य अधिकाऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचनासुद्धा दिल्या.

यावेळी १०८ रुग्णवाहिकेची आवश्यकता असल्याच्या मागणीवर आरोग्यमंत्र्यांनी सकारात्मकता दाखविली. याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन गोळे, डॉ. अर्चना गोळे, आहार समिती अध्यक्ष वासंतीताई मंगरोळे, प्राचार्य नारायण इंगळे, उपसभापती अतुल वाठ, यासह गावातील व परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महादेवखोरी मनपा शाळेचा होणार कायापालट

## सीएसआर निधीतून 'आदर्श शाळे'ची उभारणी, शिक्षण सभापती प्रीती हर्षल रेवणे यांचा पुढाकार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती-** महानगर पालिका शाळांच्या विकासाला नवी दिशा देत महादेवखोरी येथील मनपा उच्च प्राथमिक मराठी सेमी-इंग्रजी शाळेचा सर्वांगीण कायापालट करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शिक्षण सभापती प्रीती हर्षल रेवणे यांच्या पुढाकारातून या शाळेची 'आदर्श शाळा' म्हणून निवड करण्यात आली असून, दिल्ली येथील व्हॉईस एनजीओच्या माध्यमातून सीएसआर निधीतून विविध विकासकामे केली जाणार आहेत.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज स्वच्छतागृहाचे बांधकाम पूर्ण झाले असून, शिक्षण सभापती रेवणे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. प्रस्तावित विकासकामांमध्ये प्रशस्त वआधुनिक वर्गखोल्या, डिजिटल व इंटरॅक्टिव्ह क्लासरूम, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, खेळाचे मैदान आणि गार्डन यांचा समावेश आहे. तसेच सौर पॅनेल, आरओ प्रणाली, बोअरवेल रिचार्ज व्यवस्था आणि सेंद्रिय शेतीसारखे उपक्रमही राबविले जाणार आहेत. महापालिकेच्या ६३ शाळांपैकी ३० शाळांची विकासासाठी निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळावे, यासाठी मनपा प्रशासनाचा प्रयत्न सुरू आहे. शिक्षण सभापती रेवणे यांच्या पुढाकारातून 'वाचन कोपरा' हा उपक्रमही राबविला जात असून, विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. महादेवखोरी शाळेचा आठवीपासून दहावी आणि पुढे बारावीपर्यंत विस्तार करण्याचेही उद्दिष्ट आहे. त्यामुळे या उपक्रमातून मनपा शाळांना आधुनिक शिक्षणाचे नवे मॉडेल मिळण्याची अपेक्षा आहे

# तळेगाव-विष्णोरा रस्त्याची वर्षभरापासून दुरवस्था

## विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात, ७ दिवसांत रस्ता दुरुस्त न केल्यास तीव्र आंदोलनाचा ग्रामस्थांचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० मोर्शी**
तळेगाव ते विष्णोरा हा सुमारे तीन किलोमीटरचा रस्ता गेल्या वर्षभरापासून अत्यंत दयनीय अवस्थेत असून, वाहनधारकांसह विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून अनेक भागांतील डांबर पूर्णपणे उखडले आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसून अपघाताचा धोका वाढला आहे.पोरगव्हाण आणि विष्णोरा येथील पहिली ते बारावीपर्यंतचे सुमारे १०० ते १५० विद्यार्थी दररोज स्कूल बसने याच मार्गाने चांदूरबाजार येथे शिक्षणासाठी जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. स्कूल बसचालकांनाही रस्त्याच्या अवस्थेमुळे मोठी कसरत करावी लागत आहे. दररोज बसमध्ये ३० ते ४० विद्यार्थी असताना कोणत्या खड्ड्यात वाहन अडकेल किंवा अपघात होईल, याची भीती असल्याचे एका चालकाने सांगितले.या मार्गावरून दोन्ही गावांतील नागरिक बाजारपेठ, दवाखाना तसेच अन्य कामांसाठी नियमित प्रवास करतात. गेल्या वर्षभरात या रस्त्यावर अनेक छोटे-मोठे अपघात झाल्याचा ग्रामस्थांचा दावा आहे. सुदैवाने अद्याप जीवितहानी झालेली नाही. रस्त्याच्या दुरवस्थेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आहे. येत्या सात दिवसांत खड्डे बुजवून रस्त्याची दुरुस्ती न केल्यास विद्यार्थी, पालक आणि नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे. भविष्यात दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला.विद्यार्थ्यांच्या जीवापेक्षा रस्त्यावरील डांबर महाग आहे का, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# आजपासून श्री समर्थ लहानूजी महाराजांचा ५५ वा पुण्यतिथी महोत्सवाला सुरुवात

## टाकरखेडा येथे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन


श्री संत लहानूजी महाराज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० तिवसा**
दरवर्षीप्रमाणे यंदाही रक्षाबंधन अर्थात नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून श्री क्षेत्र टाकरखेडा येथे परमपूज्य श्री समर्थ लहानूजी महाराज यांचा ५५ वा पुण्यतिथी महोत्सव भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आला आहे. आज २० ऑगस्ट ते २७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, महोत्सवासाठी संस्थानच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आले आहे. श्री समर्थ लहानूजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित या महोत्सवात तीर्थस्थापना, महाप्रसाद, सामूहिक प्रार्थना व चिंतन, मौन साधना, सामूहिक ध्यान, रामधून, ग्रामफेरी तसेच समाधी व मूर्तीचे अभिषेक-पूजन असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यासोबतच 'लीलामृत' ग्रंथाचे सामूहिक पारायण, पंचपदी, हरिपाठ, काल्याचे कीर्तन, अभंगवाणी, कीर्तन, संगीत, महाआरती व श्रद्धांजली गीत आदी कार्यक्रमांनी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. महोत्सवा दरम्यान लहानूजी महाराज प्रार्थना सेवा मंडळाच्या वतीने प्रार्थना व ध्यानाचे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. तसेच लहानूजी वारकरी सेवा मंडळाच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संस्थानच्या वतीने मंदिर परिसराची स्वच्छता, भाविकांसाठी आवश्यक सुविधा तसेच इतर व्यवस्थांची तयारी करण्यात येत आहे. लहानूजी नवदुर्गा मंडळ, बालदुर्गा मंडळ आणि महिला बचत गटांच्या माध्यमातूनही विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत.दरवर्षी या महोत्सवाला परिसरातील तसेच बाहेरगावातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. यंदाही भाविकांच्या सहभागातून महोत्सव अधिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडावा, यासाठी संस्थान, विविध मंडळे आणि सेवाभावी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.श्री समर्थ लहानूजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवातील सर्व धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# महर्षी पब्लिक स्कूलच्या मेसला एफडीए ने ठोकले कुलूप; अन्नाचे नमुने तपासणीसाठी रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती :**
अन्नातून विषबाधा होऊन एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणानंतर वादग्रस्त महर्षी पब्लिक स्कूलच्या मेसवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कारवाई केली आहे. एफडीएच्या पथकाने मेसची पाहणी करून तात्काळ मेस बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे शाळा प्रशासनाच्या अडचणीत वाढ झाली आहे.१५ ऑगस्ट रोजी महर्षी पब्लिक स्कूलमधील अनेक विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने मेसची तपासणी केली. या तपासणीत



स्वयंपाकघरात अस्वच्छता तसेच अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेत अनेक त्रुटी आढळून आल्या.

एफडीएच्या पथकाने मेसमध्ये वापरण्यात येणारे खाद्यतेल, गहू आणि तांदळाचे नमुने ताब्यात घेतले असून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या नमुन्यांच्या अहवालानंतर अन्न विषबाधेचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर बाब समोर आल्यानंतर प्रशासनाने मेस बंद करण्याची कारवाई केली आहे. या प्रकरणात शाळा प्रशासनाच्या निष्काळजीपणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.अधिकाऱ्यांच्या पथकाने येथे भेट दिल्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक, अधीक्षक, परिचारिका आणि विद्यार्थी यांचे सविस्तर बयाण नोंदविण्यात आले आहे. परिचारिकेच्या मते चिखलदरा तालुक्यातील ज्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला तो कधीच अंतर्गत तपासणीकरिता आपल्याकडे आलेला नाही, असे बयाणात म्हटले आहे.

### ■ गॅस सीलिंडरऐवजी लाकडांचा वापर

आदिवासी विकास विभागाकडून नामांकित आश्रमशाळेत उपलब्ध सुविधेनुसार प्रत्येक विद्यार्थ्यामागे ५० ते ७० हजार रुपयांपर्यंत खर्च केल्या जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सुविधा असणे गरजेचे आहे. येथील स्वयंपाकघरात गॅस सीलिंडरचा वापर करणे गरजेचे होते. त्याऐवजी लाकडांचा वापर केल्या जात असल्याने मोठ्या प्रमाणात धूर साचतो, असे निदर्शनात आले आहे.

### ■ २०23 मध्ये झाली होती मान्यता रद्द

येथील असुविधेमुळे महर्षी पब्लिक स्कूलमध्ये नामांकित आश्रमशाळेची मान्यता २०२३ मध्ये रद्द करण्यात आली होती. संस्थाचालकांनी न्यायालयामध्ये धाव घेतल्यानंतर पुन्हा हा प्रकल्प येथे सुरू झाला होता, असेही अपर आयुक्तांनी स्पष्ट केले.-

# ग्रामस्थांनी ठोकले ग्रामपंचायतला कुलूप

## सरपंच सुट्टीवर, ग्रामसेवक अनुपस्थित वागडोहच्या ग्रामसभेत प्रचंड गोंधळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०पथ्रोट** जिल्हा परिषद पथ्रोट सर्कल मधील वागडोह या गट ग्रामपंचायतमध्ये आज नियमित ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, यामध्ये ग्रामरोजगार सेवकाच्या निवडी बाबत ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर निर्णय न झाल्याने प्रचंड गोंधळ झाला. ग्रामस्थांनी ग्राम पंचायतला कुलूप ठोकल्याची घटना घडली. एका ग्रामसेवकाने आपला जीव गमावल्याची घडल्यानंतर ग्रामसेवक युनियनने ग्रामसभेवर बहिष्कार टाकला आहे. अशावेळी वागडोह ग्रामपंचायत येथे आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेत ग्रामसेवक अनुपस्थित होते. त्या ऐवजी येथील शाळेचे मुख्याध्यापक राजेश गुप्ता यांना सभेचे कामकाज पाहण्याचे करिता नेमण्यात आले होते. सरपंच यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच यांची ग्रामसभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. विषय पटलावर फक्त घरकुलाचा विषय होता. सभेची सुरुवात झाली त्यामध्ये घरकुल विषयाबाबतचे वाचन सुरू होते. सदर सभेमध्ये रोजगार सेवकाची निवड करण्यात यावी व याआधीच्या रोजगार सेवकाच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी अशी एकमेव मागणी डोलार, वागडोह, गोंड वाघोली व जनुना येथील ग्रामस्थांनी लावून धरली होती. परंतु, त्यावर चर्चा न होता अध्यक्षांच्या परवानगीने आजची सभा समाप्त करण्यात येत असल्याबाबतचा निर्णय देऊन सभा समाप्त करण्यात आली. यावेळी ग्रामस्थांचा वाढता रोष पाहून त्या ठिकाणी अचलपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी हे उपस्थित झाले.

कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून पोलिस सुद्धा त्या ठिकाणी हजर झाले. परंतु, यावर काहीच तोडगा निघत नसल्याचे पाहून बिडिओ व विस्तार अधिकारी, सचिव व सभेचे अध्यक्ष तेथून निघून गेले. त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी ग्रामपंचायतला कुलूप ठोकून आपला रोष व्यक्त केला. त्यानंतर ग्रामस्थांनी गट विकास अधिकारी यांच्याकडे आपल्या विविध मागणीबाबत तक्रार देऊन सदर विषयांच्या बाबतीत चौकशी करून योग्य निर्णय देण्याची मागणी केली आहे. अन्यथा उपोषणाचा इशारा सुद्धा दिला आहे.

# दर्यापूरच्या शैक्षणिक परिसरांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर; गस्त वाढविण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० दर्यापूर-** शहरातील वाढत्या चोरीच्या घटना, वाहतूक कोंडी व अपघातांचा धोका, महिला व मुलींची सुरक्षा, अमली पदार्थांचा वाढता धोका तसेच सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर दर्यापूर शहरातील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्याची मागणी शिवसेनेने केली आहे. गटनेते प्रदीप मलिये यांच्या नेतृत्वात उपविभागीय पोलिस अधिकारी, दर्यापूर यांना निवेदन देऊन विशेष पोलिस उपाययोजना व संयुक्त सुरक्षा पाहणी मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली.



शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. गुन्हे घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा ते घडण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. रिद्धपूर येथे बसखाली येऊन चिमुकल्या मुलीचा झालेला मृत्यू लक्षात घेता शाळा-महाविद्यालये, बसथांबे, बाजारपेठा व गर्दीच्या ठिकाणी वाहतूक सुरक्षेचा विशेष आढावा घेण्याची मागणी करण्यात आली. महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षित मार्ग निश्चित करून त्या मार्गांवर नियमित पोलिस गस्त ठेवावी. शाळा व महाविद्यालय परिसरात विशेष बंदोबस्त वाढवावा. अल्पवयीन मुलांकडून वाहन चालविणे, बेकायदेशीर रेसिंग व धोकादायक वाहन चालविणाऱ्यांवर विशेष तपासणी मोहीम राबवून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. संवेदनशील व रहिवासी भागांमध्ये, विशेषतः रात्रीच्या वेळी, पोलिस गस्त व नाकाबंदी वाढवावी. गुन्हेगारी व अपघातप्रवण ठिकाणांचे सर्वेक्षण करून आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, पुरेशी प्रकाशव्यवस्था आणि नियमित गस्त उपलब्ध करून द्यावी, असे निवेदनात म्हटले आहे. अमली पदार्थांची विक्री, सेवन व पुरवठा करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करावी. ज्येष्ठ नागरिकांना बनावट फोन, ऑनलाइन फसवणूक व सायबर गुन्ह्यांपासून सावध करण्यासाठी जनजागृती अभियान राबवावे, अशी मागणीही करण्यात आली. प्रमुख चौकांवरील वाहतूक कोंडी व अपघातप्रवण ठिकाणांचे सर्वेक्षण करून गर्दीच्या वेळेत अतिरिक्त वाहतूक पोलिस नियुक्त करावेत. नागरिकांच्या समस्या थेट मांडण्यासाठी महिन्यातून किमान एकदा नागरिक-पोलिस संवाद बैठक घ्यावी. तसेच पोलिस प्रशासन, नगरपरिषद व संबंधित विभागांच्या सहभागातून संयुक्त सुरक्षा पाहणी मोहीम राबवून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदन देतेवेळी प्रदीप मलिये, गोपाल अरबट, प्रदीप वडतकर, बापूसाहेब साबळे, डॉ. दिनेश म्हाला, नगरसेवक सतीश सावळे, आशिष धानोरकर, विकी राऊत, गणेश गावंडे, नागोराव केने, राहुल भुंबर, सचिन रेखे, नीरज नागे, गोपाल गवई, प्रवीण कासरकर, बंडू इंगळे, शिवा उंबरकर, सागर विल्हेकर, मंगेश बोरेकर, श्रीधर नाईक, सागर गेठे, अनिल टाले, दिनेश धोत्रे, संजय राणे, दीपक काटोले, आकाश कराळे, सौरभ मलिये, ओम राणे यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# ग्रामपंचायत स्थलांतराचा ठराव ग्रामसभेत रद्द

## खोलापूर ग्रामपंचायत सध्याच्या जागेवरच ठेवण्याचा निर्णय, २४६ विरुद्ध १२ मतांनी ठराव मंजूर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० खोलापूर** स्थानिक ग्रामपंचायत कार्यालय स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावाला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवत ग्रामपंचायत सध्याच्या जागेवरच ठेवण्याचा ठराव ग्रामसभेत मंजूर केला. स्थलांतर न करण्याच्या बाजूने २४६, तर स्थलांतर करण्याच्या बाजूने केवळ १२ मते पडल्याने ग्रामपंचायत स्थलांतराचा विषय रद्द करण्यात आला. खोलापूर ग्रामपंचायत कार्यालयात १८ ऑगस्ट रोजी सर्वसाधारण ग्रामसभा, तर १७ ऑगस्ट रोजी महिला सभा घेण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालय स्थलांतरित करण्याचा विषय सभेत चर्चेला आला. प्रस्तावित स्थलांतराच्या जागेच्या बाजूला ग्रामीण रुग्णालय, जिल्हा परिषद मुलांची शाळा, मागील बाजूस अंगणवाडी आणि समोर मशीद असल्याने याठिकाणी ग्रामपंचायत कार्यालय हलविल्यास संबंधित संस्थांवर परिणाम होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली. सचिवालयाच्या डागडूजीवर झालेल्या खर्चाची चौकशी सुरू असून, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्याचाही विचार करण्याची मागणी करण्यात आली. ग्रामपंचायत सदस्याने सचिवालय पाडण्याबाबतचा प्रस्ताव दिल्यानंतर जिल्हा परिषद, अमरावतीचे अभियंता देवरे यांनी पाहणी करून पाडकामाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठविण्याच्या सूचना केल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मात्र, त्यानंतरही सचिवालयाच्या डागडूजीवर मोठा खर्च करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. यासर्व बाबींचा विचार करून ग्रामपंचायत स्थलांतराचा विषय रद्द करावा, तसेच अभियंत्यांच्या सुचनेनुसार सचिवालय पाडण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. मतदानावेळी २४६ ग्रामस्थांनी स्थलांतरास विरोध केला, तर १२ जणांनी स्थलांतराच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे ग्रामपंचायत सध्याच्या जागेवरच ठेवण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत पाटील भगिनींचे दैदिप्यमान यश!

## शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अमरावती शहरातील दिया व माही दोन विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन करून जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे.शहरात कार्यरत असलेले प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अतुल पाटील व बधीरीकरण तज्ज्ञ डॉ. मोनिका पाटील यांच्या सुकन्या दिया अतुल पाटील आणि माही अतुल पाटील यांनी या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी



केली.दिया पाटील हिने शिष्यवृत्ती परीक्षेत थेट राज्यात १२ वा क्रमांक पटकावला असून, ती अमरावती जिल्ह्यातून प्रथम आली आहे. तर तिचीच बहीण माही पाटील हिने देखील अत्यंत अटीतटीच्या या परीक्षेत अमरावती जिल्ह्यात ११ वा क्रमांक मिळवून आपले यश अधोरेखित केले.या दोघीही स्थानिक शाश्वत शाळेच्या इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी आहेत. एकाच घरातील दोन सख्ख्या बहिणींनी मिळवलेल्या या उत्तुंग यशामुळे सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते गौरव

दैदिप्यमान यशाची दखल घेत स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून, १५ ऑगस्ट २०२६ रोजी अमरावती येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते दिया पाटील हिचा विशेष सत्कार करण्यात आला. शिक्षणमंत्र्यांनी दिया यांना सन्मानपत्र व गौरवचिन्ह प्रदान करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

# धामणगाव तालुक्यात १४ हजार मतदार अनुपलब्ध

## १३ टक्के गणना प्रपत्रे अनकलेक्टेबल, एसआयआर मोहिमेत गंभीर बाब उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०धा.रेल्वे-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या 'विशेष सखोल पुनरीक्षण' (एसआयआर) मोहिमेत धामणगाव तालुक्यातील तब्बल १४ हजार ८१९ मतदारांची गणना प्रपत्रे प्राप्त झाली नसल्याचे समोर आले आहे. एकूण एक लाख १३ हजार ७७५ मतदारांच्या तुलनेत हे प्रमाण तब्बल १३ टक्के आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारयाद्यांची अचूकता तपासण्यासाठी तसेच दुबार, स्थलांतरित आणि मृत मतदारांची नावे वगळण्यासाठी एसआयआर मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत तालुक्यातील सर्व १३३ मतदानकेंद्रांवर बूथस्तरीय



अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) घरोघरी जाऊन गणना प्रपत्रे भरून घेण्याचे काम करण्यात आले.

### ■ २४ ऑगस्टला प्राथमिक यादी

या मोहिमेत बीएलओंच्या घरभेटींचा अहवाल आणि उपलब्ध माहितीच्या आधारे एसआयआर पूर्ण झालेल्या मतदारांची प्राथमिक यादी २४ ऑगस्ट रोजी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे. या यादीवर नागरिकांना आक्षेप, हरकती किंवा दावे दाखल करता येणार आहेत. प्राप्त दावे व हरकतींची रीतसर छाननी करून तसेच सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती आहे.

तहसीलदार अभय घोरपडे, नायब तहसीलदार वसंत पखाले, लिपीक नरेश इंगळे, माधुरी टिकले आणि तांत्रिक सहायक योगेश खरपकार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी व पर्यवेक्षकांनी या मोहिमेत कर्तव्य बजावले. घरभेटीनंतर प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार, तालुक्यातील १ लाख १३ हजार ७७५ मतदारांपैकी ९८ हजार ९५६ मतदारांचे गणना प्रपत्र स्वाक्षरीसह प्राप्त झाले आहेत. मात्र, उर्वरित १४ हजार ८१९ मतदारांचे गणना प्रपत्र प्राप्त होऊ शकलेले नाही. बीएलओंच्या प्रत्यक्ष पाहणीत घरभेटीच्या वेळी गैरहजर असणे, कायमस्वरूपी अन्यत्र स्थलांतरित होणे, मृत व्यक्ती तसेच अन्य ठिकाणी नोंदणी असलेले दुबार मतदार, अशा कारणांमुळे ही प्रपत्रे प्राप्त झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. प्रशासकीय भाषेत या मतदारांचा समावेश 'गैरहजर, स्थलांतरित आणि मृत' (एएसडी) या प्रवर्गात करण्यात आला आहे.

# अमरावतीत दहीहंडीवरून राजकीय 'दहीहंडी' पेटली; नवनीत राणांचे सूचक रील चर्चेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

अमरावतीत दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका रीलमुळे अमरावतीच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.मजबूत होने मे मजा ही तब है जब सारी दुनिया आपको कमजोर करने पर तुली है.... तो मजबुती से आगे बढिये..या पोस्ट केलेल्या रीलमुळे राणांचा रोख नेमका कोणाकडे आहे- विरोधकांवर की स्वकीयांवर- असा थेट प्रश्न उपस्थित केला जात आहे.अमरावती मध्ये दरवर्षी राणा दाम्पत्य भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करून मोठे शक्तीप्रदर्शन करत आले आहे.यंदा भाजपच्याच काही स्थानिक नेत्यांनी अमरावतीतील वेगळ्या दहीहंडी कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निमंत्रित केल्याची चर्चा सुरू आहे.राणा



दाम्पत्यासमोर आव्हान: स्वत:च्याच बालेकिल्ल्यात आणि मित्रपक्षातील स्थानिक नेत्यांकडून समांतर ताकद दाखवण्याचा प्रयत्न होत असल्याने राणा दाम्पत्यासमोर हे नवे राजकीय आव्हान मानले जात आहे.सोशल मीडिया वॉर: याच अंतर्गत स्पर्धेतून आणि शक्तिप्रदर्शनाच्या चुरशीतून नवनीत राणा यांनी विरोधकांसह पक्षातील स्पर्धकांनाही सूचक इशारा देण्यासाठी हे रील पोस्ट केल्याचे बोलले जात आहे.

# आरोपी अब्दुलचा जामीन फेटाळला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

येथील उमेश कोल्हे हत्या प्रकरणातील आरोपी क्रमांक ८ अब्दुल अरबाज अब्दुल सलीम याचा जामीन अर्ज मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाने फेटाळून लावला. विशेष सत्र न्यायाधीश चकोर एस. बावीस्कर यांनी हा आदेश दिला.

आरोपी अब्दुलने जामिनासाठी अर्ज दाखल करताना आपली कोणतीही थेट भूमिका नसल्याचा तसेच तपास पूर्ण होऊन आरोपपत्र दाखल झाले असतानाही आरोप निश्चित झालेले नसल्याने दीर्घकाळ कारावासात असल्याचा युक्तिवाद केला होता. मात्र, एनआयए फिर्यादी पक्षाने या



**उमेश कोल्हे हत्या प्रकरण**




युक्तिवादाला तीव्र विरोध केला.

अभियोजन पक्षाच्या म्हणण्यानुसार, आरोपी अब्दुल हा इतर सहआरोपींसोबतच्या कटातील बैठकीत सहभागी झाला होता. हत्येनंतर त्याने प्रत्यक्ष हल्लेखोरांना पळून जाण्यास मदत केली तसेच त्यांना अमरावतीबाहेर नेण्यासाठी वाहनाची व्यवस्था केली. तपास यंत्रणेने आरोपीच्या भूमिकेच्या समर्थनार्थ साक्षीदारांचे जबाब, सीडीआर, एसडीआर तसेच इलेक्ट्रॉनिक व तांत्रिक पुरावे न्यायालयासमोर मांडले होते. एनआयएच्या म्हणण्यानुसार, सुमारे २१ साक्षीदारांनी आरोपीच्या भूमिकेबाबत माहिती दिली आहे.

न्यायालयाने उपलब्ध पुराव्यांचा विचार करून आरोपीने हत्या करण्याच्या कटाच्या बैठकीत सक्रिय सहभाग घेतल्याचे तसेच प्रत्यक्ष हल्लेखोरांना मदत केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे नमूद केले. आरोपीविरुद्ध उपलब्ध मौखिक, दस्तऐवजी, तांत्रिक, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल पुरावे त्याचा सहभाग दर्शवतात, असेही न्यायालयाने नमूद केले. आरोपीने दीर्घकाळ कारावास व जलद सुनावणीच्या अधिकाराचा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र, प्रकरणातील आरोपींकडून वारंवार दाखल करण्यात आलेल्या जामीन व डिस्चार्ज अर्जांमुळे खटल्यास विलंब झाल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने अखेरीस आरोपीविरुद्धचे आरोप प्रथमदर्शनी सत्य असल्याचे मानण्यास पुरेसा आधार असल्याचे निरीक्षण नोंदवत जामीन अर्ज फेटाळून लावला.

# अमरावती जिल्ह्यात १५ दिवसांपासून पावसाची दडी

## खरीप पिकांवर संकट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती :**


अमरावती जिल्ह्यात गेल्या १५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यातच पावसाचा खंड पडल्याने कापूस, सोयाबीन आणि तुरीच्या उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी केवळ ६६.२ टक्के पाऊस झाला असून, सुमारे २०२.३० मिलिमीटर पावसाची तूट असल्याची माहिती आहे. जिल्ह्यात अचलपूर तालुक्यात सर्वाधिक पावसाची कमतरता जाणवत आहे.पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी होत असून, पिकांच्या वाढीवर त्याचा थेट परिणाम होत आहे. कापसाची वाढ खुंटण्याची, सोयाबीनची वाढ मंदावण्याची तसेच तुरीच्या पिकावरही ताण येण्याची शक्यता आहे. पावसाचा खंड आणखी वाढल्यास खरीप हंगामातील उत्पादनात मोठी घट होण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.दरम्यान, पेरणीनंतर पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्याने काही भागात पिकांच्या उगवण क्षमतेवरही परिणाम झाला आहे. त्यातच कापूस, सोयाबीन, तूर आणि मूग पिकांवर विविध किडींचा तसेच पाने खाणाऱ्या अळ्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे. शेतकऱ्यांनी कीड नियंत्रणासाठी फवारणी केली; मात्र पावसाची अनिश्चितता आणि वाढता रोगराईचा प्रादुर्भाव यामुळे अपेक्षित परिणाम मिळत नसल्याची स्थिती आहे.

पाऊस नसल्याने फवारणीचे नियोजनही अनेक शेतकऱ्यांनी थांबवले आहे. महागडा लागवड खर्च, वाढता कीड प्रादुर्भाव आणि पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. आकाशात ढग दाटून येत असले तरी दमदार पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.पीक वाचवण्यासाठी शेतकरी उपलब्ध साधनांनुसार प्रयत्न करत असले तरी पावसाचा खंड वाढल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने जिल्ह्यातील पावसाची आणि पिकांच्या स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

# फिनले मिलसाठी ४१ कोटींचा निधी केंद्राच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती :**

अमरावती येथील बंद असलेली फिनले मिल पुन्हा सुरू करण्यासाठी ४१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी दिले. मुंबईतील विधानभवनात झालेल्या समितीच्या आढावा बैठकीत फिनले मिलसह अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.फिनले मिल सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत आवश्यक प्रस्ताव तयार करून मुख्यमंत्री यांच्या मान्यतेनंतर केंद्र शासनाच्या परवानगीसाठी पाठविण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचे निर्देशही संबंधित विभागाला देण्यात आले. सूतगिरणी कामगारांचे प्रलंबित व थकीत अनुदान देण्याबाबतही तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. माजी खासदार नवनीत राणा आणि आमदार प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्याला या निर्णयामुळे यश मिळाल्याचे सांगण्यात आले.अचलपूर तालुक्यातील वासनी-बोर्डी




नाला आणि राजुरा सिंचन प्रकल्पांच्या रखडलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन प्रत्यक्ष कामे सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. तिवसा तालुक्यातील शिवणगाव व बोर नदी प्रकल्पांतील ३९ शेतकऱ्यांना २ कोटी ५ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याबाबतही कार्यवाही करण्यास सांगण्यात आले.अमरावतीतील छत्री तलावाच्या सौंदर्यीकरणासह चौकीदाराची नियुक्ती, तसेच इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाबाबत नागरिकांना माहिती देणारा फलक लावण्याचे निर्देशही देण्यात आले.याशिवाय पाणंद रस्त्यांतील गैरव्यवहार, औद्योगिक भूखंड विक्रीतील अनियमितता, शहराची पाणीपुरवठा योजना, रस्ते व विकासकामांतील तक्रारी, रुग्णालयांसाठी निधी आणि आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या भोजनाचा दर्जा आदी विषयांचा आढावा घेण्यात आला. शासनाची आश्वासने केवळ कागदावर न राहता निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत, असे निर्देश आमदार रवी राणा यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# अमरावतीत विद्यार्थ्यांचे अपर आदिवासी आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

महर्षी शाळेतील अकरावीच्या विद्यार्थ्याचा मृत्यू, मेळघाटातील शाळांमध्ये झालेल्या अन्नविषबाधेच्या घटना आणि विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विद्यार्थ्यांनी आजपासून अमरावतीतील अपर आदिवासी आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका आंदोलक विद्यार्थ्यांनी घेतली आहे.महर्षी शाळेत अकरावीमध्ये शिकणाऱ्या राजेश पेठेकर या विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी शाळा




प्रशासनाविरुद्ध मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, तसेच शाळेची कायमस्वरूपी मान्यता रद्द करावी, अशी प्रमुख मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. याशिवाय आदिवासी विद्यार्थ्यांना सेंट्रल किचनच्या माध्यमातून दिला जाणारा भोजन पुरवठा बंद करून पर्यायी व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक असल्याचा आरोप करत ५ ऑगस्टचा शासन निर्णय (जीआर) रद्द करण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली आहे. मेळघाटातील टीटंबा तसेच अन्य चार शाळांमध्ये सेंट्रल किचनच्या अन्नामुळे विद्यार्थी आजारी पडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनांमध्ये अन्नविषबाधा नसून व्हायरल इन्फेक्शनमुळे विद्यार्थी आजारी पडल्याचा दावा आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केल्याचा आरोप करत, त्यांच्या राजीनाम्याची मागणीही विद्यार्थ्यांनी केली आहे.विविध मागण्यांसाठी सुरू झालेले हे आंदोलन बेमुदत असून, शासनाने तातडीने दखल घेऊन मागण्या मान्य कराव्यात, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. मागण्या मान्य होईपर्यंत ठिय्या आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे-

# १२ वर्षांची परंपरा; अमरावतीत जागतिक छायाचित्र दिनानिमित्त भव्य कॅमेरा दिंडी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२० अमरावती**

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त अमरावती शहरात गेल्या बारा वर्षांपासून भव्य कॅमेरा दिंडीचे आयोजन करण्यात येत आहे. छायाचित्रण क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यासोबतच छायाचित्रकारांमध्ये एकजूट निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन केले जाते. महाराष्ट्रात सातत्याने बारा वर्षे कॅमेरा दिंडीचे आयोजन करणारा अमरावती हा एकमेव जिल्हा असल्याचे आयोजकांनी सांगितले.अमरावतीच्या या अनोख्या उपक्रमाची प्रेरणा घेत गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील अन्य तीन ते चार जिल्ह्यांमध्येही जागतिक छायाचित्र दिनानिमित्त कॅमेरा दिंडीचे आयोजन सुरू झाले आहे. त्यामुळे अमरावतीच्या या उपक्रमाने राज्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे.कॅमेरा दिंडीमध्ये शहरातील छायाचित्रकार, पत्रकार, छायाचित्रण क्षेत्राशी संबंधित व्यक्ती तसेच विविध सामाजिक व



राजकीय क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले. छायाचित्रण ही केवळ कला नसून समाजातील महत्त्वाच्या घटना, परंपरा, संस्कृती आणि इतिहास जतन करण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.या उपक्रमाला शिवसेना उपनेत्या प्रीती बंड, नगरसेवक मिलिंद बांबल, नगरसेवक ऋषिकेश देशमुख, शिवसेना जिल्हाध्यक्ष आशिष धर्माळे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम, तसेच गजानन महाराज संस्थान, विवेकानंद कॉलनी, अमरावतीचे अध्यक्ष अजय जगताप यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.बारा वर्षांची परंपरा कायम ठेवत आयोजित करण्यात आलेल्या या कॅमेरा दिंडीमुळे अमरावतीच्या छायाचित्रण क्षेत्रातील योगदानाला पुन्हा एकदा उजाळा मिळाला.

# स्मशानभूमीअभावी मेळघाटातील १५२ गावांचा अंत्यसंस्कारासाठी संघर्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० धारणी-**

मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यांतील तब्बल १५२ गावांमध्ये अद्यापही कायमस्वरूपी स्मशानभूमी उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. गावापासून तीन ते दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या ठिकाणी मृतदेह घेऊन जावे लागत असून, अनेकदा हा प्रवास पायीच करावा लागतो. त्यामुळे मृत्यूनंतरही आदिवासी बांधवांच्या हालअपेष्टा संपत नसल्याचे चित्र आहे.या गावांमध्ये मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नेताना जंगल, नदी आणि नाले पार करण्याची वेळ ग्रामस्थांवर येते. विशेषत: पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर बनते. मुसळधार पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहत असल्याने मृतदेह स्मशानभूमीपर्यंत नेणेही कठीण होते. काही ठिकाणी पावसामुळे चिता पेटत नसल्याने मृतदेह अर्धवट जळण्याची दुर्दैवी वेळही



ग्रामस्थांवर येत असल्याचे सांगण्यात येते.गावालगत स्मशान भूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांमध्ये मेळघाट व्याघ्र प्रकल्प आणि वन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राचा अडथळा निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वनक्षेत्रालगत असलेल्या गावांमध्ये स्मशान भूमीसाठी जागा निश्चित करताना विविध प्रशासकीय परवानग्यांची प्रक्रिया असल्याने हा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मृतदेहाला सन्मानाने अंतिम निरोप देण्यासाठी प्रत्येक गावा जवळ मूलभूत सुविधा असणे गरजेचे आहे. मात्र, मेळघाटातील अनेक गावांना अद्याप या मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे वन, महसूल आणि आदिवासी विकास विभागाने संयुक्तपणे तातडीने बैठक घेऊन या प्रश्नावर तोडगा काढावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.प्रत्येक गावाजवळ सुरक्षित आणि सर्व ऋतूंमध्ये वापरता येईल अशी स्मशानभूमी उपलब्ध करून द्यावी. त्यासाठी वन विभागाच्या छजउसह आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करून निधी उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी आहे. मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठीही संघर्ष करावा लागू नये आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने अंतिम निरोप मिळावा, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने हा प्रश्न मार्गी लावावा, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व
राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला
आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :